माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१२५१**

**अपिलार्थी श्री. हरेश्वर जनार्दन भोईर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ /ई-१ विभाग**
कार्यकारी अभियंता/ ई-१ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
तळ मजला, इमारत क्र ३४, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता/ ई -१ विभाग**
कार्यकारी अभियंता/ ई-१ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
तळ मजला, इमारत क्र ३४, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २२.०८.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.०७.२०२३ | १२.१२.२०२३/२४.०१.२०२४ | ११.१२.२०२३ | २३.०२.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १३.०५.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती देण्याचे नाकारले असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १२.१२.२०२३, २४.०१.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २३.०२.२०२४ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १८.०७.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार विजय बिल्डिंग, इमारत क्र. ५८, सदनिका क्र. १०, कांपरस्मिथ रोड, माझगाव, मुंबई या सदनिका विषयी माहिती/ दस्तऐवजची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना निरीक्षणाकरीता बोलविले. अपिलार्थी यांचे निरीक्षणाने समाधान न झाल्याने माहिती मिळावी म्हणून जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१, ई- १ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांनी मिळकत परिमंडळ- ३, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांना दि. १२.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयास अर्ज वर्ग करुन माहिती मिळण्यास कळविले. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१, ई- १ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांनी दि. २४.०१.२०२४ रोजीच्या पत्रातील पत्रान्वये उपमुख्य अधिकारी/ पुनर्रचित गाळे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांना कळविले की, अपिलार्थीना नस्ती निरीक्षणाकरीता बोलावण्यात आले होते. परंतु त्यांना मुद्दा क्र. अ ते इ पर्यंत आपल्याशी संबंधीत असल्याने नस्तीचे निरीक्षण करुन अर्जदारांचे समाधान झाले नाही. त्यामुळे सदर माहिती मिळण्याच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयास वर्ग करण्यात येत आहे.

अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ११.१२.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०२.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी या कार्यालयाशी संबंधीत माहिती अपिलार्थींना १० दिवसांत पुरवावी व इतर माहितीसाठी संबंधीत विभागाकडे अर्ज वर्ग करावा असे आदेशित करुन अपील निकाली काढलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीचे लेखी निवेदन दि. २२.०८.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, प्रथमदर्शनी अपिलार्थींनी विचारलेली माहिती मिळकत व्यवस्थापक, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई या कार्यालयाशी संबंधीत दिसून येत असल्याने माहिती देण्याबाबत मिळकत व्यवस्थापक, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांना कळविण्यात आले. परंतु, मिळकत व्यवस्थापक, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई कार्यालयाडून माहिती प्राप्त झाली नाही. विजय बिल्डिंग, इमारत क्र. ५८, कॉपरस्मिथ रोड या इमारतीची प्रमाणित भाडेकरु/ रहिवाशी यादी तसेच विषेश भूसंपादन अधिकारी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांनी जारी केलेले तत्कालिन भाडेकरु यांची यादी उपलब्ध आहे.

अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांचेकडे सदर सदनिकाचे मुळ कागदपत्रे उपलब्ध असूनही सदर सदनिकेत कोणी अन्य व्यक्ती राहत आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियासाठी कागदपत्रांची मागणी त्यांनी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थींना हवी असलेली माहिती उपमुख्य अधिकारी, पुनर्रचित गाळे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकेल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध भाडकरु यांची यादी अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या ५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी.

सदर प्रकरणी पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, पुनर्रचित गाळे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांची उपस्थिती आवश्यक आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०९.०९.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 25-8-2025

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : २५.०८.२०२५** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

प्रत: जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, पुनर्रचित गाळे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१२५१**
**अपिलार्थी श्री. हरेश्वर जनार्दन भोईर**
**सुनावणी दिनांक : ०९.०९.२०२५ (In continuation of order dt २५.०८.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध भाडेकरु यांची यादी अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, पुनर्रचित गाळे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांची उपस्थिती आवश्यक आहे असे आदेशित केले होते.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व श्री. सुधीर पाटील व श्री. सिध्दार्थ घोरपडे, जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे लेखी निवेदन दि.०९.०९.२०२५ व अपिलार्थींच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मुद्देनिहाय माहिती आयोगास सादर केली. तसेच त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना देण्यात आली व अपिलार्थींनी ती स्विकारली.

अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना बहुतांश माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु, ज्या पत्रांची पोहोच त्यांच्याकडे उपलब्ध आहे ते पत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे अभिलेखात उपलब्ध नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अपिलार्थींना दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission, Greater Mumbai

10-9-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १०.०९.२०२५**